सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन या संगणक प्रणालीकरिता राज्य योजना व्यवस्थापक व एजन्सी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.५१ / अर्थसंकल्प
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- ३१ मार्च, २०१८

वाचा :- १) वित्त विभागाचे D.O. No. Misc २०१७४/C.R. २९/ Try. Admn.५, दिनांक २ डिसेंबर, २०१६
२) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र. संलेको-२०१८ /पीएफएमएस/ अंमलबजावणी/ १०३, दिनांक १४ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

शासनाच्या धोरणानुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या केंद्र पुरस्कृत योजना व केंद्र सहाय्यीत योजनांकरिता सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या पध्दतीचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर प्रणालीच्या अंमलबजावणीकरिता नोडल अधिकारी, राज्य योजना व्यवस्थापक, First level Agency व Second Level Agency घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणालीच्या (पीएफएमएस) अंमलबजावणीकरिता केंद्र सहाय्यीत योजनांकरिता श्री. भा.र.गावित, सहसचिव, यांना विभागाचे नोडल अधिकारी तसेच राज्यस्तरीय योजना व्यवस्थापक, First Level Agency व Second Level Agency खालीलप्रमाणे घोषित करण्यात येत आहेत :-

अ. क्र.	योजनेचे नांव	राज्य योजना व्यवस्थापकाचे नांव व पदनाम	First Level Agency चे नाव व पदनाम	Second Level Agency चे नाव व पदनाम
१	Post Matric Scholarship for OBC (Scheme Code ९४९४)	श्री.भा.र.गावित सहसचिव (शिक्षण), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई	श्री.श्रीनाथ हेंद्रे कक्ष अधिकारी (शिक्षण) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई	श्री. भिमराव खंडाते उपसंचालक (शिक्षण), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे

नोडल अधिकारी :- नोडल अधिकारी हे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या केंद्र पुरस्कृत योजना व केंद्र सहाय्यीत योजनेकरिता सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणालीच्या समन्वयाचे काम करतील.

राज्य योजना व्यवस्थापक :- प्रत्येक राज्य योजना व्यवस्थापक यांनी प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यासाठी राज्य स्तरावर First Level Agency निर्माण करून त्यांचा प्रशासक म्हणून त्यांच्या अधिनस्त असलेल्या अवर सचिव / कक्ष अधिकारी यांची नेमणूक करावयाची आहे.

First Level Agency :- विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या निधी वितरणाच्या कार्यप्रणाली नुसार Second Level Agency निर्माण करण्याची जबाबदारी First Level Agency च्या प्रशासकाची राहिल. Second Level Agency चे प्रशासक म्हणून संचालनालय स्तरावरील योजना राबविण्यास सक्षम असलेल्या संबंधित संचालक / सहसंचालक / उपसंचालक दर्जाचे अधिकारी राहतील.

Second Level Agency :- अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर सद्य:स्थितीत कार्यान्वित असणाऱ्या या योजनेकरिता रोख प्रवाहाच्या (Cash Flow) वितरणाप्रमाणे पुढील तत्सम कार्यवाही Second Level Agency ने करावी.

ज्या एजन्सीमार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये प्रत्यक्ष लाभ दिला जाणार आहे अशा अंतिम Level Agency (उदा.आहरण व संवितरण अधिकारी DDO) यांनी त्यांच्या स्तरावरील लाभार्थी (Beneficiary) किंवा व्हेंडर यांना प्रदान करण्यासाठी प्रथमत: लाभार्थी किंवा व्हेंडर यांची नोंद करणे आवश्यक राहिल. त्यासाठी त्यांनी त्यांच्या बँक खात्याची PFMS प्रणालीमध्ये नोंदणी करणे आवश्यक राहिल. त्याचबरोबर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन (PFMS) प्रणालीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधितांनी (Scheme manager, First Level Agency, Second Level Agency) इत्यादी यांनी तद्नुषंगिक पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४०२१८४५०९७१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.04.02 18:46:53 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सहसचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
४) संचालक, (लेखा व कोषागारे), मुंबई
५) सहसंचालक (सुधारणा) संचालनालय, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई
६) उपसंचालक (शिक्षण), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
७) सर्व अवर सचिव, कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) वित्त विभाग (कोषा-४), मंत्रालय, मुंबई
९) निवडनस्ती / अर्थसंकल्प.